# प्रकरण - दुसरे

# सविनय कायदेभंग चळवळ आणि खुदाई-खिदमतगार संघटना



खुदाई-खिदमतगार संघटना ( १९३० सालच्या सत्याग्रहापूर्वीची एक छावणी )

# प्रकरण - दुसरे

## संविनय कायदेभंग चळवळ आणि खुदाई खिदमतगार संघटना

### प्रस्तावना :

हिंदूस्थानात ब्रिटीश सत्ता सार्वभौम बनली त्यावेळी तेथील लोकांत जाती धर्मभेदातील आधुनिक राष्ट्रीय भात्रना आणि लोकशाही ध्येये निर्माण झालेली नव्हती. यानंतर म्हणजे ब्रिटीशांचे राज्य स्थापन झाल्यानंतर आधुनिक विचार आपल्या राष्ट्रात फैलावण्याचे कार्य राजाराममोहन रॉय प्रभृति सामाजिक सुधारकांनी १९व्या शतकाच्या प्रारंभापासून सुरू केले. त्यात सर्व धर्मासंबंधी समत्त्वाची व सहिष्णूतेची भावना आणि जातीभेद व धर्मभेद विसरून राष्ट्रभक्ती करण्याचे ध्येय यांना प्राधान्य देण्यात आले होते. १९व्या शतकाच्या प्रारंभापासून सामाजिक आणि धार्मिक सुधारणांची ही चळवळ सुरू झाल्याने उदारमतवादी राष्ट्रवादाची भावना भारतीय जनमानसात तयार झालेली होती. याच उदारमतवादी राष्ट्रवादाच्या प्रेरणेचे रूपांतर इ. स. १८८५ साली हिंदी जनतेच्या राजकीय आकांक्षा प्रकट करण्यासाठी व त्या सफल करण्यासाठी 'राष्ट्रसभेची' स्थापना करण्यात आली. राष्ट्रसभेच्या चळवळीत दोन-तीन वर्षात बरेच सुशिक्षित मुसलमान भाग घेऊ लागले आणि राष्ट्रसभेच्या तिसऱ्या अधिवेशनाचे अध्यक्ष न्या. बद्रुद्दीन तय्यबजी हे मुस्लीम पुढारी होते. राष्ट्रसभा हळूहळू सुशिक्षित तरूणाकडून सामान्य जनतेकडे तोंड फिरवू लागल्या. चळवळीला सामान्य जनतेचा पाठींबा मिळू लागला. या चळवळीचा प्रभाव ब्रिटिश लोकांवर व पार्लमेंटवर होऊ लागला.[१] राष्ट्रसभेच्या माध्यमातून न्यायप्रिय लढा देण्याचे व निशस्त्र प्रतिकाराच्या माध्यमातून सामान्य जनतेने इंग्रजाना आव्हान उभे केले. राष्ट्रसभेच्या माध्यमातून हिंदूस्थानात राष्ट्रीय भावना आणि लोकशाही राजकारण यांची होणारी वाढ या देशातील ब्रिटिश

राजकर्त्यांना पसंत पडली नाही. राष्ट्रीय चळवळ कमजोर करण्यासाठी ब्रिटिशांनी 'फोडा आणि राज्य करा' चे धोरण अवलंबिले. १८५७ च्या सैनिक विद्रोहामध्ये मुसलमान सहभागी झाल्याने इ.स. १८५७ ते १८८० पर्यंत ब्रिटीश प्रशासनाची नीती मुसलमानांना लांब ठेवण्याचीच राहिली. यानंतर हिंदू, मुस्लीम, पारशी, शीख, ख्रिश्चनांच्या राष्ट्रवादी भावनांच्या उदयाचा अजेंडा राष्ट्रसभेच्या माध्यमातून झालेला पाहून ब्रिटिशांनी मुसलमानांना जवळ करून राष्ट्रसभेपासून त्यांना अलिप्त ठेवण्याची कुटनीती आखली. आणि 'फोडा आणि राज्य करा' या तत्त्वाचा आश्रय घेतला.[२] असे मत शैलेशकुमार वंद्योपाध्यय यांनी आपल्या 'दंग्यांचा इतिहास' या पुस्तकामध्ये मांडले आहे. ब्रिटिशांच्या डावपेचास किंवा नीतीस भारतीय बळी पडले असे म्हटले तर वावगे होणार नाही.

भारताच्या राष्ट्रीय चळवळीचा वाढता प्रभाव रोखण्यासाठी ब्रिटिशांची भूमिका व त्यांच्या प्रचाराचा रोखसुद्धा अतिशय घातक होता. भारत सचिव चार्ल्सउडने व्हॉईसरॉयला असे पत्र लिहिले होते की, "भारतातील जाती समुहातील अंतर्गत द्वंद हेच भारतामध्ये ब्रिटिशांना शक्ती प्रदान करेल, म्हणून ही फूट पाडणारी शक्ती कायम जीवंत ठेवली पाहिजे. कारण समग्र भारत आपल्या विरोधी एक झाला तर आपण किती दिवस टिकणार आहोत?"[३] तसेच १९२५ साली भारत सचिव बॉर्कनहेड यांनी व्हाईसरॉय ला पत्र लिहून कळवले कि, "भारतामध्ये सांप्रदायिक मतभेद चिरस्थायी राहण्यासाठी मी मनापासून प्रयत्न करीत आहे." भूतपूर्व सचिव ऑलिवर यांनी लंडन टाइम्स पत्रिकेमध्ये 'आम्ही भारतामध्ये मुस्लिम सांप्रदायाला हिंदू राष्ट्रवादाच्या विरूद्ध वापरण्यासाठी तराजूच्या पारड्याप्रमाणे नीती धारण केलेली आहे.' या अर्थाचा लेख लिहिला. परंतू भारतामध्ये म. गांधीजी मोठ्या प्रमाणात हिंदू-मुस्लीम दंगे थांबवण्याचे कार्य करीत होते.

हिंदूस्थानातील प्रत्येक व्यक्तीने हिंदूस्थानाच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेऊन स्वत:चा वाटा उचलला पाहिजे असे म. गांधीजी भारतीयांना कळकळीचे आव्हान करीत होते. हिंदूस्थानच्या जनतेने हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यामध्ये भाग घेतला पाहिजे असे गफारखान व म. गांधीजी यांची मनोमन इच्छा होती. म. गांधीजी नेहमी म्हणत, कायद्याच्या चौकटीत राहून अहिंसेच्या मार्गाने जुलमी इंग्रजांच्या कार्याला विरोध केला पाहिजे. लोकांच्या दैनंदिन जीवनाशी त्यांचा संबंध असेल अशीच विधायक कार्ये हाती घेतली पाहिजेत. गांधीजी आपल्या कार्यकर्त्याला उपदेश देत की, शेतकऱ्यापर्यंत जाऊन खादी उत्पादनाच्या कार्यक्रमाद्वारे शेतकऱ्याला संघटीत करून त्यांला स्वातंत्राचे महत्त्व पटवून दिले पाहिजे आणि शेतकऱ्याला स्वातंत्र लढ्यात सहभागी करून घेतले पाहिजे. गांधीजीचे असंख्य असे निष्ठावान कार्यकर्ते खेड्यापर्यंत पोहचले होते. 'यंग इंडीया' या वृत्तपत्राद्वारे गांधीजी आपल्या कल्पना देशासमोर पोहचवत असत. २१मे १९२५ च्या 'यंग इंडीया' मध्ये गांधीजींनी असे लिहिले की,- "हिंदूस्थानला स्वातंत्र मिळवण्यासाठी आपण जो मार्ग निवडला आहे. तो मार्ग फार खडतर आहे. आणि या निवडलेल्या मार्गाने यश मिळवण्यास फार मोठ्या संघटन कौशल्याची हिंदूस्थानला आवश्यकता आहे. या मार्गाने जाताना खेड्याची सेवा करण्याच्या हेतूने खेड्यापर्यंत पोहचणे गरजेचे आहे. देशातील गोरगरिब जनतेमध्ये शिक्षणाची व राष्ट्रीय जाणिवेची माणसिकता निर्माण करायची आहे. एखादा जादूगर जसे क्षणार्धात आंब्याचे झाड उभे करतो, तसे हे झटपट कार्य करता येणार नाही. ज्या प्रकारे वटवृक्ष जसा वाढतो त्याप्रमाणे राष्ट्राभिमानाचा हा वृक्ष सावकाश वाढत जाईल."[४] अशी गांधीजीची इच्छा होती.

गांधीजींनी हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य लढ्यासाठी असहकार चळवळ सुरू केली. म. गांधीजींच्या असहकार चळवळीने १९२० ते १९२२ या काळात हिंदूस्थानात सर्वत्र

धुडगुस घातला. परंतु असहकार चळवळीला हिंसक वळण लागताच गांधीजींनी असहकार चळवळ बंद केली आणि गांधीजींच्या या निर्णयामुळे कार्यकर्ते नाराज झाले.त्यामुळे ब्रिटिश सरकारला असे भासले की, गांधीजींची लोकप्रियता कमी झाली आहे. त्यामुळे ब्रिटिशांनी गांधीजींना १९२२ साली अटक केली. अशाच वातावरणामध्ये पंडीत नेहरू व देशबंधू दास यांनी 'स्वराज्य पक्षाची' स्थापना केली, कारण – हिंदूस्थानातील निर्माण झालेली राजकीय चळवळ थंड होऊ नये. ब्रिटिशांच्या राजवटी विरूध्द हिंदूस्थानच्या जनतेमध्ये असंतोष नेहमी धुमसत राहावा. व लोक इंग्रजाविरूध्द लढण्यास जागृत व्हावेत. नेहरूंनी स्वराज्य पक्षाची निर्मिती करून जनतेच्या मनातील राजकीय जागृतीची ज्योत तेवत ठेवली. परंतू ह्या पक्षाबद्दलचे आकर्षण हिंदूस्थानच्या जनतेमध्ये पाहिजे तेवढ्या प्रमाणात राहिले नाही. हिंदूस्थानामध्ये निर्माण झालेले राजकीय जागृतीचे वातावरण थंड होण्यास सुरूवात झाली. हिंदू-मुस्लिम यांच्यामधील साहचर्य कसे वाढेल याकडे म. गांधीजीनी आपले लक्ष्य एकाग्र केले. हिंदूस्थानी जनतेच्या मनातील राजकीय जागृती थंड होत असताना अचानक पुन्हा राजकीय जागृती निर्माण झाली ती सायमन कमिशनच्या नियुक्तीमुळेच.[५]

**सायमन कमिशन :**

१९१९ मध्ये हिंदूस्थानला पार्लमेंटच्या कायद्यान्वये सुधारणा मिळाल्या होत्या, या सुधारणा काय आहेत? याचे निरिक्षण करून नवीन कोणत्या सुधारणा द्यायच्या? यासाठी ब्रिटीश सरकारने १० वर्षानंतर एक कमिशन नेमले गेले आणि हे कमिशन म्हणजेच सायमन कमिशन होय. या कमिशन मध्ये एका ही भारतीयांचा समावेश नव्हता, यामुळे या कमिशनला हिंदूस्थानात मोठ्या प्रमाणात विरोध झाला कारण हे कमिशन हिंदूस्थानाचे निरिक्षण करणार व सुधारणा करण्यासाठी इंग्रजाना सांगणार.

परंतू त्या कमिशनला हिंदूस्थानातील लोकांच्या परिस्थितीचा अंदाज काहीच नव्हता त्यामुळे काय सुधारणा करणार? आणि कशा सुधारणा करणार? आणि कुणासाठी सुधारणा करणार? असे असंख्य प्रश्न निर्माण झाले. त्यासाठी त्या कमिशनमध्ये हिंदूस्थानातील प्रतिनिधीचा समावेश असावा असे भारतीय लोकांना व नेत्यांना वाटत होते. त्यामुळे 'सायमन परत जा' अशा घोषणा दिल्या. हिंदूस्थानमध्ये मोठ्या प्रमाणात सायमन कमिशनच्या विरोधात लोकांनी आवाज उठवला. सर्व देशभर उग्र आंदोलन व निषेध झाले. लाहोर येथे सायमन कमिशन गेले असता लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात सायमन कमिशनला विरोध झाला. परंतू ब्रिटीश अधिकाऱ्यांनी व पोलिसांनी आदोलकांना आडवून मोठ्याप्रमाणात अमानुष मारहाण केली. यामध्ये लालाजींवर मोठ्या प्रमाणात हल्ला झाला. आणि पुढे काही दिवसांनी लालाजी या मारहाणीमुळे मृत्यु पावले लालाजींच्या मृत्युमुळे लाहोर शहर पेटून उठले आणि सर्व देशभर सायमन कमिशनच्या विरोधी निदर्शने होऊ लागली.[६]

लालाजींवर झालेल्या लाठीहल्याचा हिंदूस्थानात अनेक नेत्यांवर धक्कादायक परिणाम झाला. सरहद्दप्रांतामध्ये राहत असणाऱ्या पठाणांच्या मनामध्ये इंग्रजाविरूद्ध मोठ्या प्रमाणात एकजुट झाली. या पठाणांच्या एकजुटीचे नेतृत्व खान अबदुल गफारखान म्हणजेच बादशाहखान हे करीत होते. गफारखान यांनी गावोगावी जावून दौरे सभा करू नयेत हवे असेल तर गफारखान यांनी स्वत:च्या गावाची शाळा चालवावी. असे ब्रिटीशांनी गफारखानांच्या वडिलांना निरोप पाठवला, परंतू गफारखान यांनी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले. तेव्हा इंग्रजांनी ३ वर्षाची सजा ठोठावली.[७]

## 'पखतून जिर्गा' किंवा 'तरूण अफगाण' संघटना :

१९२४ साली गफारखानांची तुरूंगातून सुटका झाली. त्यानंतर दोन वर्षे त्यांनी वायव्य प्रांत, पठाण मुलुख या भागाचा दौरा करून तेथील परिस्थितीचा अभ्यास केला. गफारखानांच्या असे लक्षात आले की, वायव्य प्रांतातील जे कोणी पुढारी आहेत ते ब्रिटिशांचे हस्तक आहेत. गफारखान याच्यांकडे पैसा संपत्ती मोठ्या प्रमाणात होती. परंतू त्यांनी ह्या सर्व गोष्टीचा वापर पठाणांच्या संरक्षणासाठी, हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यासाठी कारणी लावला.गफारखानांना लोकसेवेच्या बळावर नेतृत्व प्राप्त करायचे होते. व नविन शक्ती निर्माण करायची होती. गफारखानांनी वायव्य प्रातांत मोठ्या प्रमाणात संघटन कार्याला प्रारंभ केला. त्यासाठी त्यांनी 'पखतून जिर्गा' किंवा 'तरूण अफगाण' ही नवी संघटना वायव्य प्रातांत उभारली. 'तरूण अफगाण'या संघटनेच्या प्रसारासाठी गफारखानांनी 'पखतून'हे मासिक सुरू केले. प्रचलित राजकीय परिस्थितीची गफारखान यांना ओळख झाली होती. त्यामुळेच त्यांनी हे मासिक सुरू केले. गफारखान यांच्याच शिक्षणसंस्थेतून तयार झालेला तरूण वर्ग त्यांना या कार्यात मदत करीत होता. गफारखान पखतून मासिकामध्ये स्वत:चे लेख लिहित. तसेच लोकजागृतीच्या कार्यासाठी चैतन्याची भर घालणारे काव्य, साहित्य व नाट्य हे विषय त्यामध्ये भरपूर येऊ लागले.[८] त्यांच्या या प्रचारामुळे नाटके पोवाडे यांचा मोठ्या प्रमाणात वापर होत असे.

गफारखान यांनी दोन वर्षे मोठ्या प्रमाणात पखतून या मासिकामधून समाजजागृतीचा प्रचार केला. आणि सीमाप्रांत व त्या लगतचा मुलूख पिंजून काढला. गफारखान यांच्या कार्यामध्ये धर्मप्रचार करणे हा हेतू नव्हता. शिक्षणाचा प्रसार वाढवणे

आणि समाज सुधारणा करणे हा मुख्य हेतू 'पखतून' मासिकाचा होता. साम्राज्यवादी ब्रिटिशांच्या तडाख्यातून आपला देश कसा वाचवायचा आणि जुलमी ब्रिटिशांच्याकडून आपली सुटका कधी करून घ्यायची हा यक्ष प्रश्न त्याकाळी सर्व हिंदूस्थानातील नेत्यांच्या आणि जनतेच्या पुढे पडला होता. ह्या विचारांचा प्रभाव गफारखानांच्यावर मोठ्या प्रमाणात पडला होता. गफारखान यांनी पठाणांच्या दऱ्याखोऱ्यातून राजकीय व सामाजिक विचारांची संघटनात्मक कार्ये सुरू केली. त्या काळच्या नेत्यांना व मुस्लिम धार्जिण्या पुढाऱ्यांना व ब्रिटिशांना गफारखानांचे कार्य पचले नाही. जुन्या खानदानी जिर्ग्याच्या जागी नवतरूणांच्या नव्या संघटना उभ्या केल्या हीच पठाण मुलखातील गफारखानांनी केलेली पाहिली क्रांती होय. मुल्ला-मौलवी व टोळी प्रमुखांचा प्रभाव थोड्या फार प्रमाणात कमी झाला. आणि ब्रिटिशांना व त्यांच्या साम्राज्य धार्जिण्या नेत्यांना धक्का बसला. राष्ट्रवादी नवविचारांच्या वाऱ्यामुळे जसा वायव्य प्रातांवर परिणाम होऊ लागला तसा पठाण मुलखावर गफारखानांचा प्रभाव वाढू लागला. गफारखान यांच्या विचारामध्ये आणि कृतीमध्ये त्यागी, सेवाशाली व तपस्वी जीवनाचा प्रभाव होता. त्यांच्या ह्या नेतृत्वाचा फटका मुल्लामौलवी पेक्षा ब्रिटिशांना आधिक जाणवला.[९]

'पखतून जिर्गा' किंवा 'तरूण अफगाण' ही संघटना व पखतून मासिक यांच्या बळावर गफारखान यांनी वायव्य प्रातांत व पठाण मुलखात मोठयाप्रमाणात राजकीय, शैक्षणिक व सामाजिक जागृती निर्माण केली. आणि याच विचारातून नव विचारांचा अंमल व्यवस्थीत व शिस्तीने व्हावा म्हणून स्वत:ची शिस्तबध्द स्वयंसेना स्थापन केली. आणि ती म्हणजे 'खुदाई-खिदमतगार' ही संघटना होय.

## खुदाई -खिदमतगार संघटनेची उभारणी :

१९२९ साली खुदाई-खिदमतगार ही पठाणांचा संपूर्ण कायापालट करणारी संघटना निर्माण झाली. खुदाई-खिदमतगार या संघटनेने अहिंसा निष्ठेचे अपूर्व दर्शन हिंदूस्थानला व जुलमी ब्रिटिश सरकारला घडविले. म्हणूनच १९३० च्या स्वातंत्र्य आंदोलनाच्यावेळी हिंदूस्थानमध्ये एका गांधी ऐवजी दोन गांधी' हिंदूस्थानात वाढत असल्याचे जगाच्या निदर्शनास आले. गफारखान यांच्या विचार विकासातील व कार्यातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे 'खुदाई खिदमतगार' संघटना होय. लोकजागृती आणि सामाजिक कार्यामुळे गफारखान यांच्या सभोवताली तरूण पिढीची संख्या मोठ्याप्रमाणात निर्माण झाली. आणि या तरूण पिढीला या संघटनेमार्फत शिस्तीचे धडे गफारखान देऊ लागले. त्यामुळे गफारखान यांची किर्ती वायव्य प्रातांत मोठ्याप्रमाणात वाढली. 'खुदाई-खिदमतगार' या नावातच खुदाचे सेवक असे अर्थित होते. ईश्वराचे अल्लाचे सेवक असा अर्थ गफारखानांना अभिप्रेत होता. खुदाची सेवा म्हणजे जनतेची सेवा ही गफारखानांची शिकवण लाखो तरूणांच्या अंतकरणापर्यंत गेली. त्यामुळेच अवघ्या दोन वर्षात त्यांनी खुदाई-खिदमतगार या संघटनेचा जगभर नाव लौकिक पसरवला.

## खुदाई-खिदमतगार संघटनेचे नियम व अटी :

खुदाई-खिदमतगार संघटना ज्यावेळी निर्माण झाली त्यावेळी या संघटनेतील खिदमतगारासाठी काही नियम व अटी तयार करण्यात आल्या त्या पुढीलप्रमाणे-

१. मी गंभीरपणे व सत्यनिष्ठेने माझे नाव संघटनेत दाखल करीत आहे.

२. मातृभूमीच्या कार्यासाठी व रक्षणासाठी माझ्या सुखसोई व प्राण यांचा त्याग करीन.

३. अंतर्गत झगडे, हेवेदावे व भांडखोरपणा आदिपासून मी अलिप्त राहीन.

४. जुलूम अन्याय झाल्यास अन्याय करणाऱ्याच्या विरूद्ध व ज्याच्यावर अन्याय होईल त्याच्या बाजूस मी खडा राहीन.

५. दुसऱ्या कोणत्याही पक्षात मी दाखल होणार नाही. माझ्या संघटनेने परकीय सत्तेविरूध्द लढा सुरू केल्यास माझी माघार नाही व माफी मागणार नाही.

६. मी अहिंसेच्या मार्गानेच नेहमी जाईन.

७. सर्व मानवजातीची सेवा समान भावनेने करीन, माझ्या देशासाठी व धर्मासाठी स्वातंत्र्य मिळवण्याचे माझे उद्दिष्ट राहील.

८. परमेश्वराला राजी राखण्याचे त्याला संतोष देण्यासाठी माझे सर्व प्रयत्न राहतील. असे करताना वैयक्तिक स्वार्थ, हेतू किंवा भेदभाव यांचा विचार करणार नाही.[१०]

गफारखान आणि म.गांधी यांचे प्रत्यक्ष संबंध येण्यापूर्वी गफारखान यांचे धोरण लक्षात ठेवले पाहिजे. म्हणजेच गफारखान यांनी गांधीजींच्या अगोदर अहिंसेचे पालन व मार्ग अवलंबला होता. खुदाई-खिदमतगार ही संघटना गफारखान यांनी १५वर्षाच्या चळवळीनंतर निर्माण केली होती. म. गांधीजीचे सत्याग्रही व अहिंसेचे तत्वज्ञान त्याकाळी वायव्य प्रांतात पोहचले नव्हते. तेव्हा गफारखानांनी हे तत्वज्ञान आपल्या कार्यकर्त्यांना सांगितले होते. एके ठिकाणी गफारखान म्हणतात- "वायव्य प्रांतात कामाला लागलो तेव्हा आपलेच लोक आपसात भांडत होते. एकमेकांचे खून करीत होते. त्याचा परिणाम माझ्यावर झाला. आपसात जर आपण भांडत बसलो तर आपला सर्वनाश होईल यांची मला फार भिती वाटली. म्हणून मी हिंसामार्गापासून परावृत्त झालो. आपण इतरांनाही अहिंसेचा मार्ग दाखवण्याचे ठरवले, आणि हा दुसरा मार्ग म्हणजे सत्याचा, शांततेचा सद्भावनेचा व इतरांच्या जिवीताबद्दल कदर करण्याचा

होय." गफारखान पुढे म्हणतात की, मी आमच्या पूर्वजांचा इतिहास वाचला आहे. पूर्वजांबद्दल मला अभिमान आहे. पण त्याच बरोबर त्यांच्या वाईट गोष्टी बद्दल जाणीव आहे. जर पठाण एकदुसऱ्यावर प्रेम करण्यास शिकले तर जगातील कोणतीही सत्ता त्यांना चिरडू शकणार नाही.[११] माझ्या पठाण बांधवांनी हे नीट लक्षात घेतले पाहिजे असे गफारखान समाजाला उपदेशून सांगतात.

खुदाई-खिदमतगारांची प्रतिज्ञा जशी अर्थपूर्ण व त्यांचे उद्दिष्ट व मार्ग स्पष्ट करणारी आहे त्याचप्रमाणे त्याचे ध्वजगीत किंवा समुहगीत ही स्पष्ट व अर्थबोधक असे दिसते.

**खुदाई-खिदमतगारांचे ध्वजगीत किंवा समुहगीत :**

आम्ही खुदाचे सैनिक आहोत
संपत्तीची किंवा मृत्युची आम्हाला कदर नाही ।
आम्ही आणि आमचे नेते, आम्ही पुढे चाललो आहोत
मृत्युला भेटण्याची आमची तयारी आहे ।

खुदाचे नाव घेऊन आम्ही पाऊल टाकीत आहोत
आणि त्याच्याच कीर्तीसाठी आम्ही बलीदान करीत आहोत
त्याच्याच नावाने आम्ही सेवा करीत आहोत
त्याचेच आम्ही बंदे आहोत ।

खुदाच आमचा बादशहा
तोच सर्वश्रेष्ठ आहे ।
आम्ही आमच्या धन्याची सेवा करतो ।
त्याचेच आम्ही चाकर आहोत ।

आमच्या देशाची सेवा ।

आमच्या श्वसनातून आम्ही तेच करतो ।

त्या थोर देशसेवेसाठी

मृत्यु आला तर महदंभाग्य ।

आमचे लोक आणि त्यांचे कार्य

त्यावरच आमचे प्रेम आहे व तेच आम्ही करतो

आझादी आमचे ध्येय आहे ।

आमची मान त्याची किंमत आहे ।

आमच्या देशावर आमचे प्रेम आहे ।

आमच्या अंतरात त्याच्याबद्दल आदर आहे ।

निर्धाराने त्याचे रक्षण करू ।

खुदाची सेवा त्यानेच होणार ।

बंदूक व तोफ याची डर कोणाला ?

सैनिक येवोत किंवा घोडदळ येवो ।

आमचे कार्य आणि कर्तव्य ।

यामध्ये कोणीच आडवे येऊ शकणार नाही.[१२]

समुहगीताचा अर्थ लक्षात घेतल्यास खुदाई खिदमतगार या संघटनेने मनामध्ये किती मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्यासाठी निर्धार केला होता हे दिसून येतो. पठाणांना संघटीत करण्यास आणि स्वातंत्र्यासाठी लढण्यासाठी मोठ्याप्रमाणात या ध्वजगीताचा वाटा आहे.

सविनय आज्ञाभंगामुळे वायव्य सरहद्द प्रांतात जी राजकीय जागृती विविध मार्गानी प्रकट झाली. ती जागृती पाहून ब्रिटिश सरकारला जबरदस्त धक्काच बसला वायव्य सरहद्द प्रांत हा ज्याच्या रक्तातच ढाल, तलवार व तापट स्वभाव अशा पठाणांचा प्रांत अशा शूर पठाणांवर अहिंसेचा परिणाम इतक्या प्रचंड प्रमाणात होईल असे ब्रिटिशांच्या स्वप्नातसुध्दा वाटले नव्हते. पठाण फक्त तलवारीचीच भाषा समजतो. आणि तलवार आणि शस्त्राच्या बळावरच त्याला ताब्यात ठेवायचे असते. अशीच ब्रिटिश अधिकाऱ्याची समजूत होती. परंतू खान अबदुल गफारखान हे गांधीजीच्या अहिंसात्मक शिकवणुकीमुळे प्रभावित झाले आणि त्यांनी हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान व आत्मसमर्पण करण्याची जोरदार तयारी दर्शवली आणि हीच शिकवण त्यांनी लढवय्ये पठाणांना पटवून दिली. गफारखान यांनी खुदाई-खिदमतगार या संघटनेच्या माध्यमातून आपल्या कार्याची प्रचिती देण्याचा यशस्वी प्रयत्न केला. सरहद्द प्रांतातील पठाण या लढाऊ जमातीतून अहिंसक सत्याग्रहीची संघटना उभारण्याचे अलौकिक असे कार्य गफारखान यांनी हिंदूस्थानच्या इतिहासामध्ये करून दाखविले.[१३]

३१ डिसेंबर १९२९ ला लाहोर येथे रावी नदीच्या तीरावर भरलेल्या काँग्रेसच्या अधिवेशनात 'भारताला संपूर्ण स्वातंत्र्य हवे ' अशी जोरदार मागणी करणारा ठराव जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षपदी एकमताने मंजूर झाला. या अधिवेशनाच्या अध्यक्षीय भाषणात नेहरू म्हणाले, "भारताला संपूर्ण स्वातंत्र्य मिळाले पाहिजे ही आमची खंबीर भूमिका आहे. यापुढे ब्रिटीश पार्लमेंटला आम्हाला कोणतेही आदेश देता येणार नाहीत. या पार्लमेंटला आम्ही कोणतीही विनंती करीत नाही. परंतू आम्ही पार्लमेंटला व जगाच्या सद्सद्विवेक बुध्दीला हे सांगू इच्छितो की, भारत यापुढे परकीय सत्तेपुढे नमणार नाही.[१४] २६ जानेवारी हा दिवस स्वातंत्र्य दिन म्हणून देशभर

पाळला जावा असा निर्णय या अधिवेशनात घेण्यात आला. त्या वेळी अशी प्रतिज्ञा घेण्यात आली की, जगातील इतर देशाप्रमाणे स्वातंत्र्य उपभोगण्याचे, स्वत:च्या जीवनाच्या इतर गरजा पूर्ण करून सर्वांगीण विकासाची संधी प्राप्त करून घेणे हे भारतीय जनतेचे मूलभूत हक्क आहेत आणि ते हक्क नाकारण्याचा कोणालाही अधिकार नाही. ब्रिटिशांनी हिंदूस्थानातील जनतेचे मोठ्याप्रमाणात आर्थिक, सामाजिक व राजकीय शोषण केले आहे. त्यामुळे हिंदूस्थानच्या जनतेचे सर्वांगीण जीवन उध्वस्त झाले आहे. म्हणून हिंदूस्थानने ब्रिटिशांशी असलेला संबंध तोडून टाकून संपूर्ण स्वराज्याचे ध्येय साध्य केले पाहिजे यासाठी हिंदूस्थानी जनतेने एकजुटीने काँग्रेसच्या पाठीशी राहिले पाहिजे.

**मीठावरील कराविरूध्द आज्ञाभंग :**

लाहोरच्या काँग्रेसच्या अधिवेशनात संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मंजूर झाल्यापासून गांधीजी संविनय कायदेभंगाची योजना आखण्यात गुंतले होते. आणि शेवटी त्यांनी कायदेभंगाच्या म्हणजेच आज्ञाभंगाच्या कार्यक्रमासाठी मीठाच्या कायद्याची निवड केली. मीठ हे भारतासारख्या उष्ण प्रदेशात प्रत्येकाला गरजेचे आहे. मीठावर मोठ्याप्रमाणात कर लादून ब्रिटिशांनी हिंदूस्थानातील गोर-गरिब लोकांची फसवणूक केली. त्यामुळे मीठाविरूध्द कायदेभंग करणे गांधीजींना गरजेचे वाटले. म्हणून त्यांनी मिठावरील कर कमी करण्यासाठी ही कायदेभंगाची योजना हाती घेतली. आणि सत्याग्रहाच्या मार्गाने सामुदायिकरित्या ब्रिटिशांविरूध्द आवाज उठवला. गांधीजींनी आपल्या कायदेभंगाच्या चळवळीचे स्वरूप कसे असेल हे व्हाइसरॉयना कळविले. व्हाइसरॉय लॉर्ड आयर्विन यांनी गांधीजीना त्रोटक उत्तर दिले यावरून त्यांनाही चळवळीबद्दल फारसा गंभीरपणे विचार करावा असे वाटत नव्हते. चिमूटभर मीठाच्या साहाय्याने साम्राज्याला धक्का



15244

देण्याची गांधीजीची कल्पना त्यांना हास्यास्पद वाटत होती. म्हणून त्यांनी नियोजीत चळवळी बद्दल तुच्छताच दाखविली. मूठभर मीठामुळे ब्रिटिश साम्राज्याचा पायाच हादरेल अशी कल्पना त्यांना स्वप्नातही शिवली नव्हती.[१५]

**दांडी-यात्रा :**

१२ मार्च १९३० रोजी म. गांधीजीनी साबरमती आश्रमातून सुमारे ७५ कार्यकर्त्यासह साबरमती ते दांडी ही २०० मैलांची पदयात्रा काढली. साबरमती आश्रमातील कडक शिस्तीत वाढलेले निवडक सत्याग्रही लोकांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली दांडी येथील समुद्रकिनाऱ्यावर प्रथम सत्याग्रह केला. गांधीजींच्या योजनेनुसार सविनय कायदेभंगासाठी हिंदूस्थानच्या वेगवेगळ्या भागातून लोक या सविनय कायदेभंगामध्ये येण्यास सुरूवात झाली. ५ एप्रिल १९३० ला गांधीजी व त्यांचे सहकारी दांडी येथे पोहचले आणि सरकारने लादलेल्या कराविरूध्द आंदोलन केले. मीठाच्या कायद्याच्या जोडीला परदेशी कापडाच्या व दारूच्या दुकानावरील पिकेटिंग (निरोधने), सरकारी नोकरीवर बहिष्कार, जंगल कायद्यांचा भाग या कार्यक्रमाचीही सामुदायिक प्रतिकारासाठी निवड करण्यात आली. या सत्याग्रहात जवळजवळ एक लाख लोक तुरूंगात गेले. या आंदोलनाची विशेषत: म्हणजे प्रथमच हजारो महिला सहभागी झाल्या होत्या व मुस्लिम लोक ही सहभागी झाल्याने सरकार विरोधी भूमिका लोकांत सर्वदूर पसरली.[१६] मीठाचा कायदा मोडणे ही एक 'प्रतिकात्मक कृती'होती. ब्रिटिशांना भारतावर कायदा लादण्याचा अधिकार नाही, परकीय ब्रिटीश सरकारचे कायदे भारतीय जनता मानणार नाही. असे ठणकावून सांगण्यात आले तेव्हा ब्रिटिश सरकारने पं. नेहरू, जतिन्द्र मोहन सेनगुप्त यांना आणि अन्य कार्यकर्त्यांना अटक करण्यात आली. धारासना येथे जाऊन गांधीजी मीठाचा कायदा मोडणार हे ब्रिटिशांना

गांधीजीनी कळवले. तेव्हा गांधीजींना पकडण्यात आले व तुरूंगात टाकले. गांधीजींच्या सहकारी आणि स्वातंत्र्य लढ्यातील एक झुझांर नेत्या श्रीमती सरोजनी नायडू धारासना येथे गेल्या आणि त्यांनी त्या सत्याग्रहाचे मार्गदर्शन केले.[१७]

**पेशावरमधील पठाणांवरील हल्ला :**

१९२९ साली लाहोर येथे भरलेल्या कॉंग्रेसच्या अधिवेशनात शेकडो पठाण हजर होते. खुदाई-खिदमतगार हे प्रत्यक्ष कॉंग्रेसच्या झेंड्याखाली आले ते पेशावर हत्याकांडानंतर पठाण कॉंग्रेसमध्ये नसले तरी त्यांची मने मात्र कॉंग्रेसमय होती. कारण दांडी –मोर्चा सुरू होताच वायव्य सरहद्द प्रांतामध्ये चळवळीचे वारे मोठ्या प्रमाणात जोर धरत होते. डॉ. घोष, अमीरचंद बंबवाल, असलामखान सांजरी, अबदुल जलील नदवी, मिलापसिंघ आझाद इ. मोठे कार्यकर्ते दहा-बारा वर्षे कॉंग्रेसचे कार्यकर्ते म्हणून कार्य करीत होती. आणि याच कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी व खुदाई-खिदमतगारांनी लाहोरचा स्वातंत्र्याचा ठराव खेडोपाडी डोंगर-दऱ्यात पोहचवला. त्यामुळे तेथील ब्रिटिश शासनाला संकट दिसून आले. ब्रिटिश लष्करी अधिकाऱ्यांनी कार्यकर्त्यांची धरपकड सुरू केली. दारू दुकानांपुढे कार्यकर्त्यांनी आंदोलने व त्याच्या विरूध्द निदर्शने केली यांचा प्रारंभ ५ एप्रिलला झाला. दारू दुकानदारांनी दुकाने बंद करण्यासाठी २२ एप्रिल तारिख मागून घेतली.

ब्रिटिशांनी व त्यांच्या लष्कराने जातीयतेचे विष पेरून राष्ट्रीयवृत्ती मारण्याचे डाव सुरू केले होते. जेथे हिंदू चळवळी तेथे मुसलमानांच्या पलटणी आणि जेथे मुस्लीम चळवळी तेथे हिंदूच्या पलटणी ठेवल्या. पेशावर या पठाणांच्या मुलखात हिंदू-शीख आणि गढवाल यांच्या पलटणी ठेवल्या. रिकेट नावाच्या गोऱ्या अधिकाऱ्याने पलटणींना सांगण्यास सुरूवात केली की वायव्य प्रांतात ९८ टक्के मुसलमान आणि २ टक्के हिंदू



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आहेत मुसलमान हे हिंदूच्यावर अमानुष अत्याचार करतात हिंदूना नेस्तनाबूत करण्यासाठी त्यांच्या दुकानांवर निरोधने चालू आहेत. तेव्हा त्यांचा बंदोबस्त करून तुमच्या हिंदू बांधवांचे रक्षण करा असे चुकीचे संदेश रिकेट ने सांगितले. रिकेटचा डाव सैनिकांनी ओळखला होता. हिंदू असोत की मुसलमान असोत कोणावरही गोळीबार करायचा नाही. आणि इंग्रजांच्या अमिषाला बळी पडायचे नाही. असे गढवाल पलटनीच्या सैनिकांनी ठरवले होते. चळवळ ही शिस्तबध्द आणि शांततेच्या मार्गाने चालू होती. अशा या शांततामय मार्गावरच्या कार्यकर्त्यांवर गोळीबार करण्याचे आदेश इंग्रज अधिकारी देत.[१८]

२२ एप्रिलला अखिल भारतीय कॉंग्रेस समितीने लाहोर बैठकीच्या वेळी नेमलेली चौकशी समिती पेशावरकडे निघाली. पठाणांच्या प्रांतात चालू असलेल्या दडपशाहीची पाहणी करण्यासाठी ही समिती होती. त्या समितीला ब्रिटिश सरकारने मध्येच आडवले. त्यामुळे जनतेत गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सीमा प्रातांतील नेत्यांनी जागोजागी सभा घेतल्या. मिरवणुका काढल्या त्यामुळे प्रमुख नेत्यांना ब्रिटिशांनी तुरूंगात टाकले. सर्वत्र धरपकडीचे सत्र सुरू झाले. इंग्रजांनी दडपशाहीचे धोरण स्विकारले. त्यामुळे जनता भयभीत न होता इंग्रजांच्या स्वाधीन होवू लागली. ३१ मार्च च्या सुमारास पेशावर शहरातून हद्पार केलेले अमीरचंद बंबवाल रात्रीच्या वेळी चोरून पेशावरला आले आणि त्यांनी तेथील जनतेला व कार्यकर्त्यांना असे सांगितले की, ६ एप्रिलचा हरताळ पाळावा अशी भारतीय नेत्यांची विनंती आहे. परंतू अशा परिस्थितीत ते शक्य नव्हते. तरी पण हरताळाची भित्तीपत्रके सर्वत्र लावली होती. आश्चर्य म्हणजे ६ एप्रिलचा हरताळ सर्वत्र पाळला गेला सर्वत्र शुकशुकाट होता आणि कधी नाही झाली अशी प्रचंड मोठी जाहीर सभा शाहीबागेत झाली. खुदाई-खिदमतगार

ही संघटना खेड्यापर्यंत जाऊन पोहचली होती. संघटनेच्या कार्याने व अहिंसा निष्ठेने मोठी क्रांती वायव्य प्रांतात घडून आली होती. २३ एप्रिल १९३० चा तो दिवस पेशावरची घटना अखंड मानव जातीचे मन हेलावून टाकणारी घटना. हजारो लोकांच्या शांततापूर्ण जमावावर बंदूका चालवण्यात आल्या, काही तोफा डागण्यात आल्या, लोकांचा चेंदामेंदा करण्यात आला, हजारो फायरी झाडल्या गेल्या. ऐवढे होऊन सुध्दा लष्करी अधिकारी थांबले नाहीत. त्यांना खरा राग होता तो काँग्रेस दप्तरावर फडकणारा राष्ट्रध्वज. अमीरचंद बंबवाल यांना ब्रिटिश अधिकारी कॉब याने तो राष्ट्रध्वज खाली उतरवण्यास सांगितला होता. परंतू त्यांनी नकार दिला. तसेच कर्नल गार्डन यांनीही राष्ट्रध्वज उतरवण्यास सांगितले, परंतू ज्याच्या रक्तातच स्वातंत्र्य, प्रेम, राष्ट्राभिमान होता अशा बंबवाल यांनी हा राष्ट्रध्वज उतरण्यास नकार देताच त्यांच्या चेहऱ्यावर मोठ्या प्रमाणात प्रहार करण्यात आला. गोऱ्या सैनिकांनी राष्ट्रध्वज खाली उतरवून तो कॅ. गार्डन यांनी पायाखाली चुरगळून टाकला. हजारो लोकांच्या समोर हा सर्व प्रकार घडला. परंतू सर्वांनी शांततेच्या मार्गाने सहभाग घेतला. किर-साखानी बाजाराजवळ हजारोंच्या जमावावर गोळ्या झाडण्यात आल्या परंतू सभेमधील स्त्री पुरूष जागेवरून हलले नाहीत. ह्या हल्ल्यांची तुलना पंडीत नेहरू यांनी १८५७ मधील काही अत्याचाराशी केली आहे. आणि इतका ताप ज्या पठाणांना दिला. त्या विरूध्द कुठेही गवगवा केला नाही. ह्या हल्ल्यामध्ये काहींच्या शरीरावर २०-२० गोळ्या झाडल्या तरी सुध्दा लोकांनी जागा सोडल्या नाहीत. एका शिख तरूणाने पुढे येऊन गोळ्या घालण्याचे आव्हान केले तेव्हा शिपायाने तात्काळ गोळी घातली. एका वृध्द महिलेने आपल्या नात्यातील जखमी झालेली माणसे पाहून ती वृध्द महिला पुढे झाली तिच्यावरही गोळ्या झाडण्यात आल्या. एका मनुष्याच्या खांद्यावर ३-४ मुले होती त्या

महिलेची दशा वाईट वाटली. तोही पुढे झाला आणि त्याला ही गोळ्या घालण्यात आल्या असे अनेक लोक त्याच्या समोर येत होते आणि इंग्रज सैनिक त्यांना गोळ्या घालत होते. अशी ही माहिती एक पंजाब मुसलमान नेत्याने गांधीजींना लिखित स्वरूपात पाठविली वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या पेक्षा कितीतरी पटीने अधिक गोळीबार झाला होता. तरी सुध्दा जनता शांततेत वावरत होती.[१९]

पेशावरमध्ये एवढ्या मोठ्याप्रमाणात पठाणावर गोळीबार होऊन सुध्दा त्यांची दखल कोणी घेतली नाही. पठाणांवर झालेल्या अन्यायाची बातमी सांगण्यासाठी काही मुसलमान नेत्याकडे पठाण गेले असता त्याच्या बोलण्याकडे मुस्लिम नेत्यांनी लक्ष दिले नाही. काही पठाण काँग्रेसच्या नेत्यांकडे गेले तेव्हा काँग्रेसच्या नेत्यांनी विठ्ठलभाई पटेल यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली आणि अत्याचाराची चौकशी करण्याचे आदेश दिले, त्यामुळे पठाणांच्या अहिंसेच्या कहाण्या सर्व हिंदूस्थानभर पसरल्या होत्या. काही ठिकाणी इंग्रज अधिकारी म्हणतात-"अहिंसक पठाण हा हिंसक पठाणा पेक्षा अधिक भितिदायक आहे." गफारखान यांच्या नेतृत्वाबद्दल सर्व लोकांना अभिमान वाटू लागला. तशातच इंग्रजांनी गफारखान यांना अटक केली. गांधी-आयर्विन करार झाला. सर्व नेत्यांना व कार्यकर्त्यांना सोडण्यात आले. परंतू गफारखान यांना सोडण्यात आले नव्हते. त्यावेळचे सरहद्द प्रांताचे इंग्रज अधिकारी स्टुअर्ट पिअर्सन यांनी व्हाइसरॉयला कळवले की, सरहद्द प्रांतात मी आणि गफारखान दोघे राहणे शक्य नाही. त्यामुळे एकतर मी राहीन नाहीतर गफारखान राहतील. या अधिकाऱ्यांच्या बोलण्यावरून गफारखानांचा वचक दिसून येतो. म. गांधीनी इंग्रजांना आग्रह केला आणि गफारखानांची तुरूंगातून सुटका केली.[२०]

१९३० मधील अहिंसात्मक जागृतीचे वर्णन करताना जवाहरलालजी म्हणतात, "भारतातील अलिकडील संस्मरणीय घडामोडींमध्ये अबदुल गफारखानांनी पठाणासारख्या लढाऊ लोकांना राजकीय लढ्यातील शांततेच्या मार्गावर आणले. यासारखी विस्मयाची दुसरी गोष्ट नाही त्यांनी भोगलेले क्लेश भयप्रद आहेत. पण असे असले तरी पठाणांनी शिस्त व संयम विलक्षण पाळला. त्यामुळे सरकारी अधिकारी अगर अन्य कोणावरही पठाणांकडून हात उगारला गेला नाही. अत्याचार घडले नाहीत फ्राँटियर प्रांत खान अबदुल गफारखानांच्या नेतृत्वाखाली खंबीरपणे काँग्रेसच्या बाजूला येऊन खडा झाला.[२१] गफारखानांनी आपल्या व कार्यकर्त्यांच्या मागे अधिक प्रभावी संघटनेचे अगर नेत्यांचे पाठबळ मिळावे म्हणून काँग्रेस व मुस्लिम लिगच्या नेत्याशी अधिक जवळीक केली होती. परंतू लीगच्या नेत्यांना इंग्रजाविरूध्द झगडायचे नव्हते म्हणून ते नेहमी म्हणत, तुम्ही इंग्रजाविरूध्द लढत आहात त्यामुळे तुम्हाला आम्ही मदत करू शकत नाही. गफारखान हे काँग्रेस व हिंदू धार्जिण्य वृत्तीचे आहेत. इस्लाम धर्माला मान न देणारे आहेत, अशी टिका नेहमी त्याच्यांवर होत असे. त्यामुळे इंग्रजांनी गफारखान व त्यांच्या कार्यकर्त्यांचा छळ करण्यास सुरूवात केली. गफारखानांचे खुदाई- खिदमतगार संघटनेचे कार्य जोरात सुरू होते. अशातच ब्रिटिशांनी पुन्हा त्यांना अटक केली आणि सरहद्द प्रांतापासून लांब अशा बिहारच्या तुरूंगात टाकले.

**सरहद्द प्रांताला गांधीजींची भेट :**

गफारखान यांना बिहारच्या तुरूंगात ठेवल्यानंतर त्यांची काही काळानंतर तुरूंगातून सुटका झाली परंतू पंजाब आणि सरहद्द प्रातांत जाण्याची बंदी केली. तेव्हा गफारखान गांधीजींना भेटण्यासाठी वर्ध्याला आले. वर्ध्याला आल्यानंतर येथील जनतेने गफारखान यांना काँग्रेसच्या अध्यक्षपदी नेमावे असे वातावरण निर्माण केले. त्यावेळी

काँग्रेसचे अध्यक्षपद गफारखानांना दोनदा देऊ केले असता आपण केवळ एक सेवक आहोत असे म्हणून त्यांनी ते पद नाकारले एवढेच नव्हे तर प्रांतीय अगर अखिल भारतीय निवडणूकीस उभे राहण्याचेही त्यांनी कधी मान्य केले नाही.[२२] ते नेहमी म्हणत मी एक शिपाई गडी आहे. खुदाई-खिदमतगार आहे. मी जनतेची सेवा करीत आहे. मला काँग्रेसचे अध्यक्षपद नको. राजकारणामध्ये मला रस नाही: राजकरणाची मला चीड आहे. गफारखानांच्या मुंबई, कलकत्ता, पुणे येथे पठाणांच्या मोठ्या सभा झाल्या त्यांनी पठाणांना योग्य मार्गदर्शन केले. गांधीजीनी गफारखान यांना सभा घेऊ नका असा सल्ला दिला कारण गफारखानांना उगाच तुरूंगात डांबण्याची संधी इंग्रजांना द्यायची नव्हती नंतर बंगालमध्ये जाऊन लोकांची सेवा करण्याच्या प्रयत्नात असतानाच इंग्रजांनी गफारखान यांना मुंबईमधील सभेच्या भाषणाबद्दल अटक केली. आणि दीड वर्षाची सजा झाली. १९३७ च्या निवडणूकामध्ये पठाणांनी काँग्रेस व खुदाई-खिदमतगारांवर मतांच्या रूपाने आपल्या प्रेमाचा वर्षाव केला. पठाणांच्या प्रांतात जनतेच्या कैवाऱ्यांचे मंत्रिमंडळ स्थापन झाले. आणि गफारखान हे आपल्या प्रांताकडे जाण्याच्या अगोदर गांधीजींना भेटले व गांधीजीनी सरहद्द प्रांताला भेट द्यावी असे निमंत्रण दिले. आणि गांधीजीनी सरहद्द प्रांताला एक महिन्यासाठी भेटण्याचे ठरवले.

सप्टेंबर १९३८ ला गांधीजींनी वर्धा सोडले आणि दिल्लीतील काँग्रेस कार्यकारीणीच्या बैठकीसाठी काही दिवस गेले आणि गांधीजीने पेशावरचा रस्ता धरला. गांधीजीची तब्येत खराब होती. मुंबई ते पठाणांच्या भूमीपर्यंतचा प्रवास गांधीजींनी पूर्ण केला. म. गांधीजी पंजाब मार्गे प्रवास करीत होते. लोक वाटेमध्ये त्यांचे स्वागत करीत होते. मोठ्या उत्साहाने लोक जमले होते. रेल्वे स्टेशनवर मोठ्याप्रमाणात गर्दी जमली होती. परंतू गांधीजी आपले साहित्य व खादीचे कपडे घेऊन वाट चालीत होते. गांधीजी

जेव्हा पेशावर पासून २५ मैल असणाऱ्या नौशेरा येथे आले त्यावेळी गांधीजींचे भव्य स्वागत खान अबदुल गफारखान यांनी केले. तेव्हा गांधीजींच्या दर्शनासाठी लोक मैलभर रांगेत उभे होते. गांधीजी जेथे उतरले तेथे प्रार्थनेसाठी सकाळ व संध्याकाळी लोक नियमीत हजर राहत. त्यावेळी गांधीजी व्याख्याने देत. गांधीजी पेशावरला गेले असता तेथील कॉलेजमधील मुलं व मुली गांधीजींना भेटत व गांधीजीना कॉलेजला भेटण्याचे निमंत्रण देत व गांधीजी ही मोठ्या कौतुकाने शाळा कॉलेज यांना भेट देत. म. गांधीजी इस्लामी कॉलेजवर वारंवार व्याख्याने देत व हिंदू-मुस्लिम ऐक्यावर बोलत असत. सरहद्द प्रांतातील गफारखानांच्या कार्याबद्दल व यशाबद्दल गांधीजी गफारखानांना आदराने बोलत.[२३] दोन्ही गांधीचे प्रेम आणि जिव्हाळा यामुळे ९ ऑक्टोबर १९३८ साली म.गांधी सरहद्द प्रांतात गफारखान यांच्या उतमंनझाई गावी पोहचले. खुदाई खिदमतगारांनी गांधीजींचे जल्लोषी स्वागत केले. गांधीजी अनेक प्रकारे खुदाई-खिदमतगारांना अहिंसेचे रहस्य समजून सांगत होते. जगाने पाहिजे तेवढ्या प्रमाणात अहिंसेचा शोध घेतलेला नाही. गांधीजींना पठाणांनी सुरूवातीलाच असे सांगितले की, "आमच्या बादशहाखानांना तुम्ही तिकडे सहा वर्षे कैदेत ठेवून घेतले, आता आमच्या प्रेमाच्या कैदेत तुम्ही सहा महिने तरी राहिलेच पाहिजे." खुदाई-खिदमतगारांच्या या प्रेमात गांधीजी न्हाऊन गेले.[२४]

ईश्वराचा सेवक म्हणजेच खुदाई-खिदमतगार आणि खुदाचे सेवक बनवण्यास गांधाजीनी त्यांना अनेक बाबी सांगितल्या जर तुमचा कोणी अपमान किंवा छळ केला तर तो तुम्ही आनंदाने सहन केला पाहिजे. ईश्वराचे नाव घेत सर्वस्वाचा त्याग केला पाहिजे. कुणाच्याही बद्दल मनात भिती अगर द्वेष येवू देऊ नये, तर तो प्रेमाने बदलला पाहिजे. त्यासाठी गांधीजी त्यांना कबीराच्या एका वचनाचे उदाहरण देतात- जो तुमच्या

वाटेत काटे पसरतो त्याच्या मार्गात तुम्ही फुले पसरा कारण तुमच्या फुले पसरण्याने त्यालाच त्याच्या वाईट कर्माची लज्जा वाटेल आणि तो त्याचे वाईट विचार तुमच्याबद्दल काढणार नाही. तो तुमच्याशी प्रेमाने वागेल. गांधीजी म्हणतात की – अहिंसेवर ज्याची निष्ठा आहे असे मूठभर लोक सुध्दा जगाचा कायापालट करू शकतात. आणि तुम्ही तर लाख खुदाई-खिदमतगार आहात. तुमची अहिंसेवर खरी श्रध्दा असेल तर तुम्ही संपूर्ण भारताचे रूप बदलू शकता. त्यासाठी तुमची अहिंसेवर श्रध्दा खरी असली पाहिजे. गांधीजींच्या आगमनाने पेशावरचे वातावरण आनंदी निर्माण झाले होते. त्यामुळे खुदाई-खिदमतगारांच्या दृष्टिने तो दिवस सोन्याचा होता असे म्हटले तर वावगे होणार नाही. गांधीजी सर्वांना अहिंसेचे महत्व पटवून देत होते. पुढे गांधीजी म्हणतात –की, खुदाई खिदमतगार हा सर्वांना आपला वाटला पाहिजे, स्त्री-पुरूष यांना तो आपला वाटला पाहिजे. त्यांनी भितीने नव्हे तर प्रेमाने लोकांना जवळ केले पाहिजे. लोकांची त्यांनी सेवा केली पाहिजे. सर्वांना व्यसनापासून मुक्त केले पाहिजे. अशा वातावरणातून समाज सुधारतो आणि समाज सुधारला कि लोक संरक्षणासाठी तुमच्या पाठीशी व हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यासाठी उभे राहतील व अहिंसेच्या मार्गाने लढा देण्यास तुम्हाला पाठबळ मिळेल.

गांधीजीनी सांगितलेल्या अहिंसेच्या मार्गाचा लोकांवर म्हणजेच खुदाई-खिदमतगारांवर एवढा परिणाम झाला की, लोकांनी गांधीजीना सांगितले कि, "जरी गफारखान यांनी अहिंसा सोडली तरी आम्ही ती सोडणार नाही, हिंदूस्थानच्या स्वातंत्र्यासाठी लढण्यास पर्यायी मरण्यास सुध्दा तयार आहे." 'मी झेक असतो तर' हा गांधीजींचा जगविख्यात लेख गांधीजींनी पेशावरच्या मुक्कामातच लिहिला.[२५] गांधीजींची आणि गफारखानांची भेट म्हणजे साबरमती आणि स्वाती या दोन पुण्य गंगांची भेट

होती. जेव्हा गांधीजी सरहद्द प्रांतात गेले होते तेव्हा गफारखानांनी गांधीजींच्या संरक्षणासाठी रात्रपहाऱ्यासाठी सशस्त्र असे स्वयंसेवक ठेवले होते. तेव्हा गांधीजीनी तो संरक्षणाचा पहारा ताबडतोब बंद केला. तेव्हा गांधीजी गफारखानांना म्हणतात – "इतरांच्या संरक्षणासाठी सशस्त्र पोलिसांचा उपयोग होऊ देणे वेगळे व अहिंसावाद्याने स्वत:च्या संरक्षणासाठी असा वापर करणे हे वेगळे. माझ्या सर्व आयुष्यातील धोरणांशी हे विसंगत आहे."[२६] या निमित्ताने गांधीजी उपनिषदांतील सर्पाची एक गोष्ट सांगतात. एक विषारी सर्प ब्रम्हदेवाला म्हणतो माझे विषारी दात काढून घेतले तरी चालतील. परंतू फुत्कार करण्याची शक्ती तशीच राहू दे यावर ब्रम्हदेव म्हणतो; सर्पा तू नुसता फुत्कार करून राहिलास तरी सुद्धा लोक तुला मारतीलच. म्हणजेच प्रत्यक्ष हिंसा करण्यापेक्षा हिंसा करण्याची साधने जवळ आहेत अशी शंका वाटण्यानेही शत्रू तुमच्या नाशाचा प्रयत्न करणारच.

गांधीजी म्हणतात की, खुदाई-खिदमतगारांनी सविनय कायदेभंगाच्या वेळी असामान्य शौर्य दाखवले होते पण कायदेभंग हा काही नेहमीचा कार्यक्रम नाही. 'सविनय कायदेभंग' हे शेवटचे पाऊल आहे. परंतू दुर्दैवाने मला शेवटच्या टोकापासून सुरूवात करावी लागली. अहिंसेची ती एक नकारात्मक पायरी आहे. आपल्या भागातील गोरगरीब लोकांना काम मिळवून देणे. त्यांना चांगले जीवन जगता यावे म्हणून चांगली परिस्थिती निर्माण करणे स्वदेशीची भावना निर्माण करणे, शिक्षणाचा प्रसार करणे. अस्वच्छतेतून रोगराईतून लोकांची मुक्तता करणे, आणि सर्वांना महत्वाचे म्हणजे प्रत्येक क्षणाला चोख हिशोब ठेवणे. असत्य हीच खरी हिंसा आहे. हिंदूस्थानला स्वराज्य मिळवायचे म्हणजे मूठभर श्रीमंतासाठी नव्हे. गांधीजीनी सरहद्द प्रांतातील सर्व जिल्ह्यात दौरे केले आणि त्यांना अहिंसेचा संदेश दिला. प्रत्येकाने हे

लक्षात ठेवले पाहिजे कि आपला शत्रू हा आपला संभाव्य मित्र आहे. सरदारयाब येथे खुदाई-खिदमतगारचे प्रशिक्षण केंद्र उभारण्याचे ठरले होते. आणि ते सर्वांच्या श्रमातून व्हावे अशी गांधीजीची इच्छा होती. या केंद्राच्या प्रशिक्षणासाठी गांधीजीनी मीराबेनना पाठवले. नंतर गांधीजीनी अमतुस सलाम बहेनना पाठवले कारण पठाण स्त्रीयांत शिक्षण आणि समाजसुधारणा यांचे लोण पोहचले पाहिजे. मातेचे शिक्षण हेच समाजाचे शिक्षण असते, असे गांधीजी सांगत. शेवटी गांधीजी म्हणतात,-"हा सरहद्द प्रांत म्हणजे एक तीर्थक्षेत्र आहे. ही तीर्थ यात्रा वरचेवर घडावी असे मला वाटते."[२७] गफारखान यांनी गांधीजींना पुन्हा सरहद्द प्रांताला भेट देण्याचे निमंत्रण दिले. सरहद्द प्रांताचा दौरा संपल्यानंतर निघतेवेळी तक्षशिलेजवळ गफारखान व गांधीजी दोघांच्या डोळ्यामध्ये पाणी आले असे स्वत: गांधीजी आपल्या लेखात सांगतात.

पठाण हे शूर आणि शक्तीशाली होते. त्यामुळे ते सरहद्द प्रांताचे संरक्षक म्हणूनच कार्य करित राहिले. त्या पठाणांनी सरहद्द प्रांतासाठी लढा दिला. कित्येकवेळा तुरूंगात गेले. हे त्यांचे धाडस खरोखरच पाहण्याजोगे आहे. त्यामुळे खुदाई - खिदमतगार हे त्यांच्या संघटनेच्या माध्यमातून व प्रशिक्षणातून वैयक्तिकरित्या बळकट व कौशल्यवान बनले ह्यात काही शंकाच नाही.[२८] खुदाई-खिदमतगार या संघटनेच्या उदयालाच ब्रिटिशांचा विरोध होता. खुदाई-खिदमतगार या संघटनेच्या कार्यामध्ये सुसंस्कृत यंत्रणा होत्या. हिंसेच्या मार्गात अडथळा आणणे, अन्यायी पध्दतीला विरोध करणे इ. कार्ये त्यांची होती. खुदाई-खिदमतगारांचा दृष्टिकोन हा होता. वैचारिक क्षेत्रामध्ये ते सरकारच्या पध्दतीला विरोध करीत होते. यातूनच पठाणांचा दर्जा दिसून येतो. १९३० च्या किस्सा कहाणीबाजार हत्याकांडानंतरच्या राजकीय बदलाला सरकारने मोठ्याप्रमाणात विरोध केला. सरकारने भाषण करण्यास बंदी घातली कारण

गफारखान यांच्या विचाराची सर्वसामान्य जनतेवर छाप होती. मौला-मौलवीनी समाजात जी विघातक कृत्ये सुरू केली होती त्याला आळा घालण्याचे काम त्यांनी हाती घेतले होते.[२९] गांधीजींच्या विचाराचा व आचाराचा पगडा मोठ्याप्रमाणात पठाणांवर पडला होता.

अशा प्रकारे खुदाई खिदमतगारांचे कार्य आणि योगदान कायदेभंग चळवळीमध्ये अहिंसेच्या मार्गाने खुदाई-खिदमतगार संघटनेद्वारे मोठ्याप्रमाणात झालेले आपणास पहावयास मिळते.

# संदर्भ सूची

१) जावडेकर आचार्य - 'आधुनिक भारत', सुलभ राष्ट्रीय ग्रंथमाला, पुणे, १८९०, पृ. क्र. ४१९.

२) वंद्योपाध्याय शैलेशकुमार – 'दंग्यांचा इतिहास', सर्वसंघ प्रकाशन, राजघाट, वाराणसी, २०००, पृ. क्र. १४५.

३) वंद्योपाध्याय शैलेशकुमार – उपरोक्त, पृ. क्र. १४६.

४) प्रधान ग. प्र. – 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत', साधना प्रकाशन, पुणे, २००४, पृ. प्र. २३६.

५) डॉ. पवार जयसिंगराव – 'हिंदूस्थानच्या स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर, १९९८, पृ. क्र. १९१.

६) – उपरोक्त, पृ. क्र. १९१, १९२.

७) थत्ते यदूनाथ – 'सरहद्द गांधी : खान अबदुल गफारखान', साधना प्रकाशन, पुणे-३०, १९६९, पृ. क्र. ३३.

८) जोशी ह. मो. – 'बादशाहखान', नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९६८, पृ. क्र. ५०,५१.

९) – 'बादशाहखान', नीलकंठ प्रकाशन, पुणे, १९६८, पृ. क्र. ५०.

१०) – उपरोक्त, पृ. क्र. ५२.

११) – उपरोक्त, पृ. क्र. ५३.

१२) – उपरोक्त, पृ. क्र. ५३, ५४.

१३) प्रधान ग. प्र. – 'स्वातंत्र्य संग्रामाचे महाभारत', साधना प्रकाशन, पुणे, २००४, पृ. क्र. २५५.

१४) – उपरोक्त, पृ. क्र. २४६, २४७.

१५)          – उपरोक्त, पृ. क्र. २४९.

१६) पंडित नलिनी – 'गांधी', ग्रंथाली प्रकाशन, मुंबई, १९८३, पृ. क्र. १०७.

१७) प्रधान ग. प्र. – उपरोक्त, पृ. क्र. २५१.

१८) थत्ते यदूनाथ – 'सरहद्द गांधी : खान अबदुल गफारखान', साधना प्रकाशन, पुणे-३०, १९६९, पृ. क्र. ४२, ४३.

१९) जोशी ह. मो. – उपरोक्त, पृ. क्र. ५९, ६०.

२०) थत्ते यदूनाथ – 'सरहद्द गांधी : खान अबदुल गफारखान', साधना प्रकाशन, पुणे-१९६९, पृ. क्र. ४४,४५.

२१) नेहरू पंडित – 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया', एशिया पब्लिशिंग हाऊस, बॉम्बे-१९४६.

२२) तर्कतीर्थ श्री. जोशी लक्ष्मणशास्त्री – मराठी विश्वकोश, खंड-४, महाराष्ट्र राज्य साहित्य सांस्कृतिक मंडळ, मुंबई, १९७६, पृ. क्र. ६८९.

२३) तेंडूलकर डी. जी. – 'महात्मा', (खंड-४), भारत सरकार प्रकाशन, जुलै १९५२, पृ. क्र. २५१.

२४) थत्ते यदूनाथ – उपरोक्त, पृ. क्र. ५२.

२५) जोशी ह. मो. – उपरोक्त पृ. क्र. ११९.

२६)          – उपरोक्त पृ. क्र. १२०.

२७) थत्ते यदूनाथ – उपरोक्त, पृ. क्र. ५७.

२८) मुकूलिका बॅनर्जी – 'द पठाण अनआर्मड्', ऑक्सफोर्ड युनिर्व्हसिटी प्रेस, न्यू दिल्ली-२००१, पृ. क्र. १०२.

२९)          – उपरोक्त, पृ. क्र. १०३.